Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.

महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष १५ * अंक २५९ * * भंडारा * | शनिवार, दिनांक ९ मार्च २०२४ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## आयटीएटीकडून काँग्रेसला मोठा धक्का!

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८:

आयकर अपीलीय न्यायाधिकरणाने काँग्रेस पक्षाला मोठा झटका दिला आहे. काँग्रेस पक्षाकडून करण्यात आलेली याचिका आयटीएटीने शुक्रवारी फेटाळली आहे. काँग्रेस पक्षाच्या बँक खात्यांवर केल्या जाणाऱ्या आयकर विभागाच्या कारवाईवर स्टे आणण्याची मागणी काँग्रेसने या याचिकेद्वारे केली होती.

आयकर विभागाने काँग्रेस आणि यूथ काँग्रेसशी संबंधीत चार बँक खाते गोठवले होते. आयकर विभागाने २१० कोटींची रिकव्हरी मागीतली आहे. म्हणजेच काँग्रेसला ही रक्कम दंड म्हणून आयकर विभागाला द्यावी लागणार आहे.

## खरीखरी...

## गांधी, गुजरात आणि गॅरंटी

काँग्रेसचे नेते राहुल गांधी आज गुजरातमध्ये दाखल झाले आहेत. त्यांच्या भारत भ्रमण दौऱ्यातील गुजरात शेवटून दुसरे राज्य आहे. तीन-चार दिवस गुजरात राज्यात फिरून 12 तारखेला ते एकेकाळी काँग्रेसचा झेंडा बुलंद करणाऱ्या महाराष्ट्रातील नंदुरबार येथे दाखल होतील. गुजरात मध्ये असताना राहुल गांधी यांच्याबरोबर जनतेच्या आणि विशेषता महिला व तरुणांच्या झुंडीच्या झुंडी बरोबर येत आहेत. नेहमीप्रमाणे राहुल गांधी गुजरात राज्यात आल्यावरही अदानी यांच्या साम्राज्यावर हल्ला करते झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गॅरंटी देशात नवे युग येणार असे म्हणत आहे. इकडे राहुल गांधी यांनी मोदी यांची गॅरंटी आपल्याकडे वळवून घेतली आहे आणि त्यांनीही काही ग्यारंट्या दिल्या आहेत. शिकल्या, सवरलेल्या तरुणांच्या बेरोजगारीवर उतारा म्हणून राहुल गांधी यांनी डिग्री हाती आल्यावर देशातील प्रत्येक तरुणाला एक वर्ष एक लाख रुपये स्टायपेंड म्हणून देण्याची घोषणा केली आहे. ही गोष्ट लहान नाही. पुन्हा अनेक शहाणे पत्रकार राहुल गांधी एक लाख रुपये कुठून आणतील, असा तडका मारलेला प्रश्न विचारतील. त्याचे उत्तर राहुल गांधी यांनी आज देऊन टाकले आहे. गुजरात राज्यातील कितीतरी बड्या बड्या उद्योगपतींच्या वरील हजारो कोटी रुपये कर्ज माफ करण्यात आले आहे. राहुल गांधी यांच्या भारत भ्रमणातील गुजरातचा टप्पा महत्त्वाचा मानला पाहिजे. भारतभर त्यांच्यासोबत अक्षरशः हजारो कार्यकर्ते फिरले. मग ते तामिळनाडू असो की उत्तर प्रदेश असो. प्रत्येक ठिकाणी राहुल गांधी यांच्या दोन आश्वासनांचे काय होणार, हाच प्रश्न विचारला जात होता. जी हवा सध्या चालविली जात आहे. त्या हवेत पंतप्रधान नरेंद्र मोदी आज कितीतरी मोठ्या विजयाकडे जात आहेत असे दृश्य आहे. यामुळेच राहुल गांधींच्या यात्रेत येणारा मोठा जनसमुदाय समर्थनासाठी की उत्सुकतेपोटी येतो, याचेही मोजमाप कुठेतरी झाले पाहिजे. काँग्रेसची एकछत्री सत्ता जाऊन कितीतरी वर्षे झाली आहेत तरी काँग्रेसवाले त्याचा कुठे उच्चारही करीत नाहीत. आपण एकेकाळी भारताचे एकछत्री राजे होतो हा विचार काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मनातून बाहेर जात नाही. त्यामुळे आधुनिक काळात जी यंत्रणा राबविली पाहिजे, ती राबवण्यासाठी काँग्रेसवाले तयार असतील असे वाटत नाही. या यात्रेत मोठ्या प्रमाणावर गर्दी जमते. याचे कारण गुजरात राज्यात आताही भाजप विरुद्ध काँग्रेस हीच लढाई आहे. इतर पक्षांना फारसा वाव नाही आणि गेल्या पाच-सहा निवडणुकांचे निकाल पाहता काँग्रेसलाही भाव नाही. भारतातील इतर प्रांतांप्रमाणे गुजरातचा शेतकरीही दुःखी आहे. इथे चार दोन निवडणुकीतील पदे मिळवण्याइतकीच काँग्रेसची ताकद आहे. गुजरात काँग्रेसचे कार्यकर्ते किती काम करतात आणि कुठे कसा विजय मिळवून देतात तेच आपल्याला बघायचे आहे. विजय मिळवून देतात याचा अर्थ गुजरात राज्यातील 24 पैकी दोन चार जागा तरी काँग्रेसला मिळतील काय, असा आहे. मोदी यांची कर्मभूमी ते उत्तर प्रदेशला दत्तक दिल्यामुळे उत्तर प्रदेश असली तरी ते खुद्द गुजरातचे आहेत. गुजरातचे हितकर्ते आहेत आणि आपल्या गृहराज्याला सर्वाधिक लाभ कसा मिळेल याचा विचार करणारे आहेत, हे सत्य लपून नाही. अशा या गुजरात मधून राहुल गांधी यांनी आपल्या घणाघाती भाषणात त्यांचे हक्काचे आवडते उद्योगपती अदानी यांची चांगलीच धुलाई केली. अशा एकूण परिस्थितीत राहुल गांधी यांच्यासमोर चोंबडेगिरी करणाऱ्या खुषमस्कऱ्यांवर विश्वास टाकावा की एवढ्या भीषण परिस्थितीतही गुजरातमध्ये काँग्रेस कायम आहे, याबद्दल तेथील जनतेचे कौतुक करावे हाच मोठा प्रश्न आहे. एकूणच गांधी आणि गुजरात यांचे नाते परमपवित्र असल्यामुळे राहुल गांधी यांना गुजरात राज्यात तरुणांपासून नोकरदारांपर्यंत आणि शेतकऱ्यांपासून मजुरांपर्यंत गॅरंटी देण्याची भाषा करावी लागली आहे. मोदी यांच्या गॅरंटीला जागतिक प्रतिसाद मिळतो. राहुल गांधी यांची गॅरंटी अजूनही गुजरातच्या जमिनीवर लोळत आहे. आधुनिक गांधींनी गुजरात राज्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गॅरंटीच्या समांतर गॅरंटीची सुरुवात केली आहे असे दिसते.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# महाराष्ट्रातील १२ खासदारांचा पत्ता कट होणार?

## अंतर्गत सर्व्हेत स्ट्राईक रेट चांगला नसल्याचे निष्पन्न

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८:

भाजपच्या राज्यातील जवळपास १२ खासदारांचा आगामी निवडणुकीतून पत्ता कट होणार असल्याचा दावा केला जात आहे. भाजपने राज्यीतल विद्यमान खासदारांचे पक्षांतर्गत ३ सर्व्हे केले होते.

त्यात डझनभर खासदारांचा स्ट्राईक रेट समाधानकारक नसल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या खासदारांचा निवडणुकीतून पत्ता कट होणार असल्याचा दावा सूत्रांनी केला आहे.

माहितीनुसार, आगामी सार्वत्रिक निवडणुकीत भाजपने धक्कातंत्र अवलंबण्यात येत आहे. या अंतर्गत अनेक विद्यमान खासदारांना तिकीट नाकारून त्यांच्याजागी नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाणार आहे. उमेदवारी देताना विद्यमान खासदारांनी गत ५ वर्षांत किती प्रभावी कामगिरी केली? हाच एकमेव निकष डोळ्यांपुढे ठेवण्यात आला आहे. त्यामुळे येत्या २ दिवसांत भाजपच्या उमेदवारांची दुसरी यादी येईल तेव्हा त्यात जवळपास डझनभर नावे नवीन असतील. भाजपने राज्यात केलेल्या पक्षांतर्गत सर्व्हेतही जवळपास डझनभर खासदारांची कामगिरी समाधानकारक नसल्याचे निष्पन्न झाले आहे. यामुळे ही शक्यता वाढली आहे.

स्थानिक पातळीवरील राजकारण, जनतेत असणारी नाराजी, निवडून येण्याची हमी असणाऱ्या मजबूत उमेदवारांची गरज, ३ पेक्षा अधिक वेळा निवडून आलेल्या उमेदवारांवर असणारे आक्षेप आदी कारणांमुळे भाजपच्या जवळपास डझनभर विद्यमान खासदारांची उमेदवारी कापली जाणार आहे, असेही समजते. यामुळेही अनेक खासदारांची धाकधूक वाढली आहे.

### विदर्भातील तिघांचा समावेश?

भाजपच्या अंतर्गत सर्व्हेत राज्यातील अनेक खासदारांचा स्ट्राईक रेट चांगला नसल्याचे निष्पन्न झाले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, नांदेड व बीडसह धुळे, सोलापूर, सांगली, लातूर, अहमदनगर, जळगाव, उत्तर मुंबई, उत्तर मध्य मुंबई, अहमदनगर, रावेर या मतदारसंघासह विदर्भातील तीन मतदारसंघाचा संघांचा समावेश आहे. त्यामुळे या मतदार संघांत भाजप कुणाला उमेदवारी देते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# अपघातात तीन ठार



■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. ८:

जिल्ह्यातील मलकापूर नजीक झालेल्या अपघातात किमान तीन जण ठार झाले. एक इसम गंभीर जखमी झाला असून वाहनात अडकला होता. शर्थीचे प्रयत्न करून पोलीस, समाजसेवी व नागरिकांनी त्याला बाहेर काढले.

राष्ट्रीय महामार्ग ६ वरील तालासवाडा फाट्या जवळ ही भीषण दुर्घटना घडली. ट्रक क्र. एम पी १४ ३७८६ आणि आयशर वाहन क एम एच १९ - सिएक्स ०९७७ यांची समोरासमोर भरवेगात धडक होऊन अपघात झाला.

यामध्ये ३ जण जागेवरच ठार झाले. १ इसम जखमी झाला. मार्गावर सध्या दुरुस्ती मुळे एकेरी वाहतूक सुरू असल्याने सदरचा अपघात घडल्याची चर्चा आहे. दरम्यान, उशिरापर्यंत मृतक आणि जखमींची नावे कळू शकली नव्हती.

## काँग्रेसची पहिली यादी आली

### ३९ नावे, ४ महिला, राहुल गांधी वायनाडमधून लढणार

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. ८:

लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने ८ मार्च रोजी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. शुक्रवारी संध्याकाळी पक्षाने ३९ उमेदवारांची घोषणा केली. या यादीनुसार राहुल गांधी वायनाडमधून निवडणूक लढवणार आहेत. ते आजही तेथून खासदार आहेत. राहुल यांच्याशिवाय भूपेश बघेल आणि शशी थरूर यांचीही नावे यादीत आहेत.

काँग्रेसच्या पहिल्या यादीत १५ उमेदवार सर्वसाधारण प्रवगार्तील, २४ उमेदवार एससी-एसटी, ओबीसी आणि अल्पसंख्याक प्रवगार्तील आहेत. भाजपच्या यादीनंतर 7 दिवसांनी काँग्रेसची पहिली यादी आली आहे.

काँग्रेसने पहिल्या यादीत माजी मुख्यमंत्री आणि दोन माजी मंत्र्यांना उमेदवारी दिली आहे. शिव दहरिया आणि ताम्रध्वज साहू यांना तिकीट देऊन जातीय समीकरण तर पक्षाने राखलेच पण ज्या मोठ्या विभागांना काँग्रेसच्या मंत्र्यांनी सांभाळले होते, त्यांना मैदानात उतरवून भाजपचा पराभव केला पाहिजे, असा संदेशही दिला आहे.

काँग्रेस पक्षाने पहिल्या यादीत केरळमधील २० पैकी १६ जागांसाठी उमेदवार जाहीर केले आहेत. राहुल गांधी यांना वायनाडमधून चौथ्यांदा आणि तिरुवनंतपुरममधून तीन वेळा खासदार राहिलेले शशी थरूर यांना तिकीट देण्यात आले आहे. याशिवाय पक्षाचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल अलप्पुझा येथून निवडणूक लढवणार आहेत.

राहुल गांधी - वायनाड
भूपेश बघेल - राजनांदगांव
डॉ. शिवकुमार डहेरिया जांजगीर - चांपा
ज्योत्स्ना महंत - कोरबा
राजेंद्र साहू - दुर्ग
विकास उपाध्याय - रायपुर
एचआर अलगर राजू - बीजापुर
गीता शिवराजकुमार - शिमोगा
श्रेयस पटेलहासन (कर्नाटक)
एसपी मुद्दाहनुमेगौडा - तुमकुर
वेंकटरामगौडा - मांड्या
डीके सुरेश बेंगलुरु रूरल
आशीष कुमार साहा - त्रिपुरा वेस्ट
गोपाल छेत्री - सिक्किम
सुपौंगमेरेन जमीर - नागालँड
राजमोहन उन्नीथन - कासरगोड
के सुधाकरन - कन्नूर

## तर तुम्हाला विरोधातच बसावे लागले असते

### शिंदे गटाचे भाजपाला प्रत्युत्तर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८:

भाजपने पाठिंबा दिल्यामुळे एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्याच्या देवेंद्र फडणवीस यांच्या टीकेला शिंदे गटाने चोख प्रत्युत्तर दिले आहे. आम्ही ११५ आमदार असूनही एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केल्याच्या भाजपच्या दाव्यात तथ्य आहे.

पण एकनाथ शिंदे यांनी उठाव केलाच नसता तर भाजपच्या १०५ जणांना आजही विरोधात बसावे लागले असते हे ही तेवढेच खरे आहे. त्यामुळे कुणीही कुणाचेही श्रेय लाटण्याचे प्रयत्न करू नये, असे शिंदे गटाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ठणकावून सांगितले आहे.

रामदास कदम यांनी भाजपवर केसाने गळा कापण्याचा आरोप केला होता. त्यांच्या टीकेला प्रत्युत्तर देताना फडणवीस यांनी भाजपने शिवसेनेचा नेहमीच सन्मान केल्याचा दावा केला होता. त्यावर शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी शुक्रवारी समाचार घेतला.

भाजपच्या १०५ आमदारामुळे शिंदे मुख्यमंत्री झाले हे खरे आहे. पण एकनाथ शिंदे यांनी उठाव केलाच नसता तर त्या १०५ जणांना विरोधी बाकांवर बसावे लागले असते, असे शिरसाट यांनी ठणकावले आहे.

## ग्रॅच्युइटीबाबत केंद्राचा मोठा निर्णय

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ८:

आगामी लोकसभा निवडणुकीपूर्वी केंद्र सरकानरने कॅबिनेट बैठकीत ग्रॅच्युइटीबाबत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. मोदी सरकारने ग्रॅच्युइटीसाठीची टॅक्स मर्यादा वाढवून २५ लाख रुपये केली आहे. आता या रकमेपर्यंत ग्रॅच्युइटी झाल्यास त्यावर कुठलाही टॅक्स द्यावा लागणार नाहीये. ही मर्यादा यापूर्वी २० लाख रुपये इतकी होती.

सेंट्रल बोर्ड ऑफ डिरेक्ट टॅक्सने ८ मार्च २०१९ च्या नोटीफिकेशनमध्ये टॅक्स फ्री ग्रॅच्युइटी लिमिट १० लाखांहून वाढवून २० लाख करण्यात आलं होतं.याशिवाय केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनर्ससाठी महागाई भत्ता देखील वाढवण्यास या बैठकीत मंजूरी देण्यात आली आडे. केंद्रीय कॅबिनेटने महागाई भत्त्यामध्ये ४ टक्के वाढ करण्यास मंजूरी दिली आहे. आता कर्मचाऱ्यांना ५० टक्के महागाई भत्ता मिळेल. हा महागाई भत्ता १ जानेवारी २०२४ पासून लागू होईल.

## सुधा मूर्ती यांची राज्यसभेवर निवड

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. ८:



प्रसिद्ध लेखिका, इन्फोसिस फाउंडेशनच्या अध्यक्षा आणि इन्फोसिसचे सह-संस्थापक नारायण मूर्ती यांच्या पत्नी सुधा मूर्ती यांची राज्यसभेवर निवड करण्यात आली आहे.

या निवडीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर पोस्ट करून सुधा मूर्ती यांचं अभिनंदन केलं आहे. महिला दिनानिमित्त त्यांना मिळालेली ही मोठी भेट असल्याचे सुधा मूर्ती यांनी म्हटले आहे.

## महाविकास आघाडीकडून वंचितला २ जागा?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८:

राज्यात महाविकास आघाडीचा लोकसभेच्या जागा वाटपांचा तिढा अद्याप सुटलेला नाही.

वंचित बहुजन आघाडीच्या बार्गेनिंगमुळं याला उशीर होत असल्याचं सांगितलं जात आहे. पण आता एक महत्वाची माहिती समोर आली असून त्यानुसार, वंचितला मविआनं केवळ २ जागा दिल्याची चर्चा आहे.

वंचितच्या प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर यांनी यासंदर्भात एका पत्राद्वारे संताप व्यक्त केला असून येत्या ९ मार्चच्या बैठकीत यावर साकारात्मक चर्चा कराल अशी अपेक्षा त्यांनी उद्धव ठाकरे, शरद पवार आणि बाळासाहेब थोरात यांच्याकडं व्यक्त केली आहे.

तसेच आपली युती भक्कम व टिकाऊ करण्याचा आमचा प्रयत्न आहे, याची आम्ही तुम्हा तिघांना खात्री देत आहोत, असंही त्यांनी म्हटलं आहे.

## प्रफुल्ल पटेलांच्याही कुंडल्या माझ्याकडे..

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८:



गोंदिया व भंडारा या दोन्ही जिल्ह्यातील आमदार, खासदार व माजी आमदार, खासदारांची कुंडली माझ्याकडे आहे, असे वक्तव्य खा. प्रफुल्ल पटेल यांनी केले होते. त्याला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आ. नाना पटोले यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

पटेलांकडे कुठली कुंडली आहे मला माहिती नाही. पण माझ्याजवळ त्यांच्या दोन्ही प्रकारच्या कुंडल्या आहेत. ज्यावेळी त्या कुंडल्या काढायचा प्रश्न येईल त्यावेळी त्या काढल्या जातील, असे पटोले म्हणाले.

## त्या कारस्थानात फडणवीस सामील?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८:

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना अपमानित करण्यासाठीच भाजपने त्यांच्या उमेदवारीची घोषणा टाळली आहे. भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीचे सदस्य म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही या कारस्थानात आनंदाने सहभागी झाले, असा आरोप शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर निशाणा साधताना केला आहे.

संजय राऊत यांनीही भाजप नितीन गडकरी यांचा हेतुपुरस्सर अवमान करत असल्याचा आरोप केला आहे. गडकरींच्या नावाला विलंब हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कारस्थान असल्याचे राऊत म्हणालेत.




